नि.दि.दावा नं. ४२/२०२१
मंदाकिनी विरुध्द शिवाजीराव
CNR-MHSN14000314-2021

## नि.क्र. ६४ वरील आदेश

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यामध्ये ज्यादा पक्षकार सामील करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादींचेविरुध्द दस्त बेकायदेशीर, रद्दबातल व बनावट आहे असे जाहीर होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा सुरु असताना प्रतिवादी नं. २ यांनी दावा मिळकतीचे त्यांचे नावे असलेले संपूर्ण क्षेत्र प्रेमला संग्राम शिंदे, भूमी अनिरुध्द पाटील व भारती भगवान निकम यांना दावा मिळकत दि. २७/१०/२०२२ रोजी खरेदी दिली आहे. त्यामुळे सदर त्रयस्थ व्यक्ती दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. सबब त्यांना प्रतिवादी नं. ३ ते ५ म्हणून सामील करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. सबब, वादीने त्यांचा अर्ज मंजूर करणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी नं. १ व २ तर्फे प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दिले आहे. त्यांनी वादींचा अर्ज खोटा चुकीचा बेकायदेशीर असल्याचे व काम लांबविणेसाठी दिल्याचे कथन केले आहे. अर्जाच्या शाबीतीकरिता वादींनी कोणताही कागदोपत्री याकामी दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी नं. १ व २ तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दस्त बेकायदेशीर, रद्दबातल व बनावट आहे असे जाहीर होवून मिळणेसाठी तसेच वादींचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व मिळकती विक्री करु नये अशी निरंतरची मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींनी प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी नं. २ यांनी अर्जात नमूद ति-हाईत इसमांना दावा मिळकतीचे खरेदीखत करुन दिल्याचे कथन केले आहे. वादींनी नि.क्र. ६६ लगत सदर खरेदीखताची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे. सदर

प्रतीवरुन प्रतिवादी नं. १ व २ यांनी ति-हाईत इसमांना दावा मिळकतीचे खरेदीखत करुन दिल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव तसेच निरंतर मनाईकरिता दाखल केलेला असल्यामुळे ति-हाईत इसम हे या प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करुन घेतल्यास दावा गुणावगुणांवर चालण्यास मदत होणार आहे. तसेच पुढील गुंतागुंत होणार नाही व नवीन प्रकरण दाखल होणार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी तसेच ति-हाईत इसम यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास संधी मिळणार आहे. त्यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी अर्जात नमूद ति–हाईत इसमांना प्रतिवादी नं. ३ ते ५ म्हणून दाव्यात सामील करुन मुदतीत दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2024.04.24 11:47:28 +0530

शिराळा

दिनांक २३/०४/२०२४

(**श्रीमती व्ही. ए. देसाई**)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
शिराळा

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 23/04/2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 24/04/2024 |
| Judgment uploaded on | : | 24/04/2024 |